----------------------

Media Coverage – Tree Plantation initiative at Chaas and Kolwadi by Bharat Forge

लोकमत

# चास व कोटमदरा येथे वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**घोडेगाव :** चास ठाकरवाडी व कोळवाडी कोटमदरा येथे ५०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच झाडे टिकावीत यासाठी लोखंडी टि गार्ड बसविण्यता आले.

महाराष्ट आरोग्य मंडळ पुणे व भारत फोर्ज कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला. यामध्ये चिंच, आवळा, जांभुळ, फणस, आंबा, सिताफळ, पिंपळ, वड, रेनटी, शिवण अशा विविध प्रकारची झाले लावण्यात आली. ही सर्व रोपे बन विभागा मार्फत डिंभे येथील रोपवाटिके मधून देण्यात आली. नुसती झाडेल लावण्यात आली नाही, तर या सर्व झाडांसाठी लोखंडी टि गार्ड बसविण्यात आले. तसेच उन्हाळयामध्ये झाडे टिकावीत यासाठी सर्व झाडांना ठिबक सिंचनाद्धारे पाणी दिले जाणार असल्याची माहिती महाराष्ट आरोग्य मंडळाचे सागर मिटकरी व जयदिप लाड यांनी दिली.



चास ठाकरवाडी येथे वृक्षारोपणात सहभागी झालेल्या तुलसी भोर व ग्रामस्थ.

जिल्हा परिषद सदस्य तुलसी भोर, सचिन भोर, रवींद्र चासकर उपस्थित होते. या कार्यक्रमात भारत फोर्जच्या ७० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तर कोळवाडी कोटमदरा येथे डॉ. दादा गुजर पतसंस्थेच्या संचालकांनी वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेतला. यामध्ये अध्यक्ष अनिल गजर, भगवान चौधरी, रविंद्र गोगावले, भिकन पाटील, सुरेखा निकम, पवन अग्रवाल, दगडु शितोळे, युवराज शेवाळे, संदिप जगताप यांनी सहभाग नोंदवला. तसेच महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे कर्मचारी माधव पडवळ, अमोल झगडे, सोमा काळभोर, महादेव नरहरी, अशोक चौधरी, डॉ. शरयु कोरे, रत्नमाला पेठे, सीमा ठाकुर, किशोर भोर, उदयसिंह चौधरी यांनी झाडे लावण्यास मदत केली.

Hello Pune Gramin
Page No. 7 Jul 07, 2017
Powered by: erelego.com